ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# कृषी आणि भारतीय अर्थव्यवस्था

**मोर कृष्णा दिलीप**

*संशोधक विद्यार्थी,*

*एल.व्ही.जी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पंचवटी, नाशिक*

***Corresponding Author:* मोर कृष्णा दिलीप**

**DOI - 10.5281/zenodo.14875341**

***गोषवारा:***

*जगातील सर्वोच्च अर्थव्यवस्थेमध्ये भारतीय अर्थव्यवस्था सहाव्या स्थानावर आहे. देशातील बहुसंख्य लोकसंख्या त्यांच्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. देशाचे एकूण जी .डी. पी मध्ये कृषी क्षेत्राचा वाटा आणि त्याचे 14% भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असले तरी सेवाक्षेत्र च्या तुलनेने सुधारत असताना या क्षेत्रात सातत्याने घसरण होत आहेत.*

---

**प्रस्तावना:**

शेती हा भारतातील सर्वात जुना आणि परंपरागत व्यवसाय आहे. आजही देशातील जवळजवळ 57% करतील लोकसंख्या शेती या प्रमुख व्यवसायावर अवलंब आहे. अतिविकासाच्या दृष्टिकोनातून आजही शेतीचे स्थान वरचे आहे. कृषी हा मूलभूत व्यवसाय मानला जातो. याचे विकासावरच देशातील उद्योगधंदे वाहतूक व दळणवळण बँका वित्तीय संस्था विदेशी व्यापार विद्यार्थी विकास अवलंबून आहे. कृषीतून उत्पादित होणाऱ्या अन्न धान्यातूनच लोकसंख्या चे भरून पोषण होते. स्वातंत्र काळात भारतीय कृषीचे सर्व स्थान आणि महत्त्वाचे बरेच बदल झालेले आहे. आजही भारतीय कृषी योजना वाढलेले आहे.कृषी उत्पादनात वाढ होत आहे. स्वातंत्र काळातही बराच वर्षापर्यंत भारतात अन्नधान्याची आयात करावी लागली होती. आज भारत अन्नधान्यबाबत स्वयंपूर्ण झाला आहे. हेच कृषी विकासाचे प्रमुख लक्षण मानले जाते. कृषीतून उत्पादित होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग वाढत आहे. म्हणून भारतात औद्योगिक विकासाचा दर वाढला आहे.

**उद्दिष्टे:**

१) भारतीय शेतीची भूमिका चा अभ्यास करणे.

२) कृषीसाठी भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्त्व स्पष्ट करणे.

३) कृषी विकास साठी उपाययोजना सुचवणे.

**गृहीतक:**

1) भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र सातत्याने विकासहोत आहे.

या पेपर साठी दुय्यम सामग्रीचा वापर केला आहे नियम सामग्री मध्ये पुस्तके मासिके व नियतकालिकेइंटरनेट वेबसाईट यांचा समावेश केला आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेतशेतीची भूमिका:**

जी.डी.पी मध्ये योगदान-स्वातंत्र्याच्या काळापासून देशाच्या GDP मध्ये कृषी क्षेत्राचा मोठा वाटा आहे. 1950 51 ह्या आर्थिक वर्षात देशाचा एकूण जी.डी.पी. मध्ये कृषी आणि संबंधित क्रिया कलापाचा वाटा 59% होता. कृषी क्षेत्रामध्ये सातत्याने घसरवत असते तरी भारतीय अर्थव्यवस्थेतील हे क्षेत्र अजूनही सर्वात महत्त्वाचे.क्षेत्र आहे.

**१) सर्वात मोठे कर्मचारी क्षेत्र**: भारत देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्म्याहूनअधिक लोक कृषी क्षेत्रात गुतलेले आहेत. ज्यामुळे ते देशातील सर्वाधिक कर्मचारी असलेले क्षेत्र बनते. विकसित राष्ट्राची तुलना केल्यास भारतामध्ये एकूण लोकसंख्येपैकी सुमारे 54.6% कृषी क्षेत्रात गुंतलेलेआहेत. तर यु.के ,यु.एस, फ्रान्सआणि ऑस्ट्रेलिया या विकसित राष्ट्रांमध्ये एकूण लोकसंख्येचा केवळ दोन टक्के ते सहा टक्के लोक गुंतलेले आहेत.

**२)अन्नाचा स्रोत:** भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे आणि एवढा मोठा लोकसंख्येला पोसण्यासाठी अन्नपुरवठ्याची सतत गरज भासते. म्हणून शेतीची गरज आहे आणि अर्थव्यवस्थेसाठी कृषी क्षेत्रावर कमी अवलंबित्वाची गरज आहे.कृषी आणि औद्योगिक क्षेत्रांमधील संबंध-उत्पादनाचा निरंतर उत्पादनासाठी कच्चा मालाची सतत गरज असते. आणि ही गरज पूर्ण करण्यासाठी देशातील बहुतेक उद्योग हा कच्चामाल थेट कृषी क्षेत्रातून गोळा करतात भारतात औद्योगिक क्षेत्रातील उत्पन्नापैकी निम्मे उत्पन्न हे कृषी आधारित उद्योगांमधून येते.

**३)व्यावसायिक महत्त्व:** भारतीय शेती ही औद्योगिक क्षेत्रासाठी आणि व्यापारांच्या हेतूसाठी अंतर्गत आणि बाह्य दोन्ही महत्त्वाची आहे चहा कॉफी साखर काजू मसाले ई .कृषी उत्पादने जे खाद्यपदार्थ आहेत आणि ताग कापूस आणि इतर कापड उत्पादने एकूण देशाच्या एकूण निर्यादित अनुक्रमे 50% आणि 20% योगदान देतात ते देशाच्या एकूण निर्यातीच्या जवळपास 70 टक्के जोडतात आणि देशाला परकीय चलनमिळवण्यास मदत करतात.

**४)शासनाच्या महसुलात योगदान:** केंद्र आणि राज्य सरकारच्या उत्पन्नाचा सर्वात महत्वाच्या स्रोत शेती आहे. वाढत्या जमीन महसुलातून देशाचा सरकारला भरीव महसूल मिळते. तसे कृषी मालाची हालचाल भारतीय रेल्वेला महसूल मिळवून देण्यास मदत करते ज्यामुळे सरकारला महसूल निर्मितीमध्ये मदत होते.

**भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी चे महत्व:**

अति विकासाच्या कोणत्याही टप्प्यात कृषी ही मानाची पोषक उद्योगाची जननी असते. कृषी आपला विकास करू शकत नाही.

**१) राष्ट्रीय उत्पन्नात कृषीचा वाटा:** देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात ज्या क्षेत्राचा वाटा जास्त आहे. ज्या क्षेत्र पासून जास्तीत जास्त राष्ट्रीय उत्पन्न प्राप्त होते. त्या क्षेत्राचे महत्त्व जास्त असते. भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा जास्त आहे. स्वातंत्र्य पूर्व काळात एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कृषी वाटा 56.1% होता तो स्वातंत्र्योत्तर काळात कमी कमी होत गेलेला आहे. याची कल्पना येते.

| वर्ष | घटक खर्चानुसार स्थूल देशांतर्गत उत्पादन (कोटी रु .) | कृषी व संलग्न क्षेत्राचे उत्पादन (कोटी रु .) | स्थूल देशांतर्गत उत्पादनात कृषी संलग्न क्षेत्राचा वाटा (%) |
|---|---|---|---|
| १९५०-५१ | २७९६१८ | १५०१९१ | ५३.७१ |
| १९६०-६१ | ४१०२७९ | २०४३४० | ४९.८० |
| १९७०-७१ | ५८०७८७ | २५८६६५ | ४४.५४ |
| १९८०-८१ | ७९८५०६ | ३०५९०६ | ३८.३१ |
| १९९०-९१ | १३४७८८९ | ४४४८८० | ३३.०० |
| २०००-०१ | २३४८४८१ | ५९२२२७ | २५.२२ |
| २०१०-११ | ४९१८५३३ | ८२८४३१ | १६.८४ |
| २०११-१२ | ५२४७५३० | ८६४५३७ | १६.४८ |
| २०१२-१३ | ५४८२१११ | ८७२८३८ | १५.९२ |
| २०१३-१४ | ५७४१७९१ | ९०७३८६ | १५.८० |

स्रोत -Economic Survey -2013-14 Page A-5 ,Table No.1.3A

भारत सरकारच्या आर्थिक सर्व्हेक्षण २०१३-१४ माहितीनुसार २००४-०५ च्या स्थिर किमतीनुसार १९५०-५१ मध्ये भारताचे स्थूल देशांतर्गत उत्पादन २७९६१८ कोटी रुपये होते. १९५०-५१च्या चालू किमतीनुसार ते १००३६ कोटी रुपये होते. GDP मध्ये कृषी व कृषीशी संलग्न क्षेत्र जसे वनव्यवसाय, मासेमारी आणि खाणकाम व्यवसाय यांचा वाटा ५३.७१% होता. ते १५०१९१ कोटी रुपये होते. २०१३-१४ मध्ये GDP ५७४१७९१ कोटी होते. यात कृषी व संलग्न क्षेत्राचे उत्पादन ९०७३८६ कोटी रुपये होते. यासाठी GDP मध्ये वाटा १५.८०% पर्यत कमी झाला असे आढळते.

**२)रोजगाराच्या दृष्टीने कृषीचे महत्त्व:** भारतात रोजगाराची प्रमुख साधन म्हणून कृषी क्षेत्राकडे पाहिले जाते. देशातील जास्तीत जास्त श्रमिक रोजगारासाठी कृषी हा खाजगी क्षेत्रावर अवलंबून आहे. 15 ते 59 वर्षे वयोगटातील जास्तीत जास्त करता लोकसंख्या कृषीवर अवलंबून आहे .स्वातंत्र्यपूर्व काळात एकूण करत्या लोकसंख्येपैकी 69.5% लोकसंख्या कृषी व कृषी संलग्न व्यवसाय मध्ये गुंतलेली होती .1991 मध्ये हे प्रमाण 66.9% आणि 2001 मध्ये 56.6% असे कमी झाले.

**३)अन्नधान्याची वाढती मागणी पूर्ण करण्यात महत्त्व:** देशाची लोकसंख्या जशी वाढत जाते. तशी भरण पोषण्यासाठी अन्नधान्याची मागणी वाढत जाते, वाढी लोकसंख्या आणि अति विकासाच्या प्राथमिक टप्पा यात लोक ची अन्नधान्याची मागणी जास्त लवचिक असते. उत्पन्नात थोडी जरी वाढ झाली तरी अन्नधान्याच्या मागणीत मोठ्या प्रमाणात वाढ होते. व त्या लोकसंख्येची अन्नधान्याची वाढी मागणी पूर्ण करण्याच्या प्रमुख स्रोत कृषी हाच आहे. वाढती अन्नधान्याची मागणी पूर्ण करण्यासाठी प्रथम विस्तारित शेती केली जाते.नंतर सदन शेती केली जाते आहे. त्याचा जर शेत जमिनीत खते बियाणे कीटकनाशके जलसिंचन यांत्रिकीकरण जास्तीत जास्त वापर करून कृषी उत्पन्न वाढ करण्याचा प्रयत्न केला जातो.

**४)औद्योगिक विकासासाठी कृषीचे महत्व:** कोणत्याही देशाचा औद्योगिक विकास कृषी क्षेत्रावर अवलंबून असतो.सूत आणि ताग उद्योग,काजू उद्योग, साखर उद्योग असे प्रकारचे उद्योग कृषी मालावर आधारित उद्योगांचा विकास कृषी क्षेत्रातून उत्पादन होणाऱ्या कापूस, ताग, ऊस, तेलबिया, धान्य, कडधान्य, फळे, भाजीपाला, मसाला पदार्थ ,चहा ,कोकम इत्यादी कच्चे मालाच्या उत्पादनावरून असतो. कृषी क्षेत्राचा विकास जातो, तसा औद्योगिक क्षेत्राचा विकास होत जातो. देशातील लघुउद्योग आणि कुटिरोद्योगांनाही लागणारा कच्चामाल कृषी क्षेत्रातून पुरवला जातो. जशी जाम, जेली, बेकरी उत्पादने ,फळाचा गर व रस, लोणचे ,पापडी ई..उद्योगांना कच्चा माल कृषीतून उत्पादीत होतो.

**५) भांडवल निर्मितीसाठी कृषीचे महत्व:** स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतीय अर्थव्यवस्था एक मागास अर्थव्यवस्था ती आजची भारतीय अर्थव्यवस्था जलद वेगाने विकास साध्य करणारी आहे. असे असले तरी आज भारतात भांडवलाच्या अभावाने अतिविकासाची गती मंदावते. भारतात भांडवल टंचाईची प्रमुख कारण कमी उत्पन्न आणि कमी बचत प्रवृत्ती हे आहेत. भारतीय शेतीचे उत्पादन कमी आहे आणि त्याच लोकांची भूकवर्ती जास्त असल्याने कृषी क्षेत्रात विक्री वाढवा मार्केट सप्लाय कमी आहे.

**६)आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्व:** ज्या देशातून कृषी उत्पादन प्राथमिक वस्तूची मोठ्या प्रमाणात होते. एकूण निर्यातीत कृषी वस्तूचा वाटा कमी असतो.अशा देशाची अर्थव्यवस्था अविकसित मानली जाते. परंतु अति विकास साध्य करण्यासाठी त्या देशाला कृषी मालाची किंवा वस्तूची निर्यात केल्याशिवाय पर्याय नसतो.

निर्यात उत्पन्नातून विकासात्मक भांडवली वस्तूंची आयात करता येते. या निकषानुसार भारतीय अर्थव्यवस्थेच्या विचार केल्यास भारतातून बऱ्याच काळापर्यंत चहा-काफी, कापड, मसाल्याची पदार्थ , कापूस, तंबाखू ह्या परंपरागत वस्तूची मोठ्या प्रमाणावर निर्यात केली.

**७)आर्थिक नियोजनात कृषी चे महत्व:** कृषी हा अर्थव्यवस्थेचा कणा असतो. कृषीचा विकास झाला तर त्याचा प्रसार पण अर्थवस्थेतील सर्व क्षेत्राचा विकास गतिमान होतो. असे कृषी उत्पन्नात वाढ झाली तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते.उत्पन्नात वाढ झाली आणि त्यांचे औद्योगिक क्षेत्रात होणाऱ्या उपभोग वस्तू व कृषी भांडवल वस्तू मागणी वाढते. पण औद्योगिक क्षेत्राचा विकास होत जातो. कृषी उत्पन्न वाढ झाल्यास वाहतूक व दळणवळण साधनांची मागणी वाढते. कृषी वित्त पुरावठाची गरज भागवण्यासाठी बँक वित्तीय संस्थांचा विकास होतो. कृषी उत्पन्न वाढ झाली तर देशांतर्गत व्यापरात वाढ होते. ग्रामीण विकासात चालना मिळते. अशाप्रकारे कृषी विकासातून देशाच्या सर्व विकास गतिमान होतो .या उलट कृषी उत्पन्नात घट झाली तर सर्वावर विपरीत परिणाम होतो.

**कृषी विकास साठी उपाययोजना:**

१) कृषी विकासासाठी नवनवीन संशोधनाच्या वापर केला पाहिजे.
२) तंत्रज्ञानाचा वापर करू आधुनिक शेतीला चालना देणे.
३) कृषी विकासासाठी कृषी पूरक व्यवसायांना चालना देणे.
४) उत्पादन वाढवण्यासाठी सेंद्रिय शेतीच्या वापर करावा.
५) कृषीचे उत्पादन वाढवण्यासाठी वेगवेगळ्या सरकारी योजना राबवावे.
६) कृषी क्षेत्रात रोजगार निर्मितीला चालना द्यावे.

**निष्कर्ष:**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. केवळ भारतीय अर्थव्यवस्थेला पाठिंबा देत असूनही, कृषी क्षेत्र औद्योगिक क्षेत्र आणि आयात आणि निर्यातीतील आंतरराष्ट्रीय व्यापाराला देखील समर्थन देते. भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे योगदान कमी होत असले तरी, हे असे क्षेत्र आहे ज्यामध्ये देशभरात सर्वाधिक लोक काम करतात

**संदर्भसुची:**

१) भारतीय अर्थव्यवस्था -१ डॉ एन.एल.चव्हाण प्रशांत पब्लिकेशन 01 मार्च 2015
२) युनिक अकॅडमीक
३) www.drishtilas.com
४) www.adda247.com